# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 11/06/2020 (गुरूवार)

(दुपार)

## दुखापत

1) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 8 कि. मी अंतरावर कांद्री माईन मनसर येथे दिनांक 09/06/2020 चे 20:00 वा. ते 20:30 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) रवि रामदाश कठौते, वय 31 वर्ष, रा. कांद्री माईन मनसर, 2) स्वाती कठौते, वय 26 वर्ष, रा. कांद्री माईन मनसर व 3) मुन्नी कठौते, वय 48 वर्ष, रा. कांद्री माईन, मनसर यांनी संगनमत करून फिर्यादी नामे– सौ. निशा विनोद गुडसुंदरे, वय 31 वर्ष, रा. कांद्री माईन मनसर यांना जुण्या भंडणाच्या कारणावरून फिर्यादीच्या घरासमोर येवुन शिवीगाळ करून "तु आम्हाला जाण्यासाठी रस्ता दिला नाही, आज एखादयाची लाश पाडल्याशिवाय येथुन जाणार नाही" असे म्हटले त्यावर फिर्यादीने "तु आज पर्यंत किती लाश पाडले" असे म्हटले असता आरोपी क्र. 1 याने हातातील काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारहाण करून जखमी केले. फिर्यादीचा मुलगा नामे– सचिन व पती हे तिला वाचविण्याकरीता आले असता आरोपीतांनी मुलाचे माणेवर, पतीचे डोक्यावर काठीने मारहाण करून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामेश्वर रावते 9420409454 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 8 कि. मी अंतरावर कांद्री माईन मनसर येथे दिनांक 09/06/2020 चे 08:00 वा. ते 08:30 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) विनोद गुडसुंदरे, वय 50 वर्ष, रा. कांद्री माईन मनसर 2) सोनु, वय 20 वर्ष, रा. नागपुर, 3) सचिन विनोद गुडसुंदरे, वय 22 वर्ष, रा. कांद्री माईन मनसर व 4) बाली विनोद गुडसुंदरे, वय 27 वर्ष, रा. कांद्री माईन मनसर या सर्व आरोपीतांनी फिर्यादी नामे– रवि रामदाश कठौते, वय 31 वर्ष, रा. कांद्री माईन, मनसर यास शिवीगाळ करून काठीने मारहाण केली. तसेच आरोपीतांनी फिर्यादीच्या अंगावर तिखट फेकले व धारधार वस्तुने मारहाण करून जखमी केले. यानंतर आरोपीतांनी फिर्यादीस व त्यांच्या आई व पत्नीस शिवीगाळ करून काठीने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामेश्वर रावते 9420409454 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर